## पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996



दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



## शैक्षणिक
शासकीय कौशल्य विकास बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, मोटर वाइंडिंग, ऑटोमोबाइल मैकेनिक टेक्नीशियन, टू थ्री फोरव्हीलर मैकेनिक, कम्प्यूटर ऑपरेटर, कम्प्यूटर पीसी मेंटेनेंस, एसी मैकेनिक, प्लंबर, फिटर, वेल्डर पात्रता 10 वी/12 वी पास / नापास कॉलेजचे विद्यार्थी, कामगार / कर्मचारी यांनाही प्रवेश ST पास ची, प्लेसमेंट ची, वायरमन लायसन ची सोय
पाटील इलेक्ट्रॉनिक इन्स्टिट्यूट, राधिका रोड, सातारा
मोबाईल 9822097071 वर्ष ४० वे



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २८९ वा | बुधवार, दि. ०१ जुलै २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# कर्जमाफीसाठी 'तारीख पे तारीख'! सरकारचा शब्द फोल; शेतकऱ्यांचा संताप वाढला

## ३० जूनची मुदत हुकली; राज्यपालांच्या स्वाक्षरीचे कारण पुढे, ५६ लाख शेतकरी अजूनही प्रतीक्षेत

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्य सरकारने मोठ्या गाजावाजात जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने' ची अंमलबजावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली आहे. अर्थसंकल्पात मुख्यमंत्री यांनी ३० जूनपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्याची घोषणा केली होती. मात्र जून महिना संपूनही प्रत्यक्षात एकाही शेतकऱ्याच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा झालेली नाही. त्यामुळे सरकारचा पहिला शब्द फोल ठरल्याची टीका होत असून, कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या लाखो शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.



**कर्जमाफीच्या अटींमध्ये बदलाचे संकेत**
कर्जमाफी योजनेतील काही अटींवर विरोधकांनी आक्षेप घेतल्यानंतर त्या शिथिल करण्याची मागणी जोर धरत आहे. याबाबत मुख्यमंत्री यांनी यापूर्वीच उपसमिती सकारात्मक निर्णय घेईल, असे संकेत दिले होते. त्यामुळे अटींमध्ये बदल होण्याची शक्यता कायम आहे.

विधानसभेत या विषयावर उत्तर देताना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी कर्जमाफीच्या अंमलबजावणीसाठी ५ जुलै ही नवी तारीख जाहीर केली. राज्यपालांच्या स्वाक्षरीनंतर निधी वितरणाची प्रक्रिया सुरू होईल आणि त्यानंतर शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळण्यास सुरुवात होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### ३० जूनचा शब्द हवेतच; सरकारची आणखी एक डेडलाईन

अर्थसंकल्पावेळी सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देत जूनअखेर कर्जमाफीचा लाभ देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आता ती मुदत उलटून गेल्यानंतर सरकारने नव्याने ५ जुलैची तारीख जाहीर केली आहे. त्यामुळे सरकारकडून केवळ तारखा बदलल्या जात आहेत, प्रत्यक्ष लाभ मात्र मिळत नसल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

### राज्यपालांच्या स्वाक्षरीमुळे विलंब?

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत सांगितले की, कर्जमाफीसाठी आवश्यक आर्थिक तरतुदीला विधिमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर प्रस्ताव राज्यपालांकडे स्वाक्षरीसाठी पाठवला जाणार आहे. त्या प्रक्रियेनंतरच निधी वितरण सुरू होईल. त्यामुळे शेतकऱ्यांना ५ जुलैपासून प्रत्यक्ष लाभ मिळण्याची अपेक्षा आहे.

### ३६ हजार ५८५ कोटींचा बोजा; ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ

सरकारच्या प्राथमिक अंदाजानुसार राज्यातील ५६ लाख शेतकरी या योजनेचे लाभार्थी असणार आहेत. त्यासाठी तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. अर्थसंकल्पात २ हजार कोटी रुपयांची प्रारंभिक तरतूद करण्यात आली असून, डिसेंबरच्या पुरवणी मागण्यांमध्ये आणखी ३ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार असल्याची माहिती कृषिमंत्र्यांनी दिली.

### राजू शेट्टींचा सरकारवर हल्लाबोल

कर्जमाफीच्या विलंबावरून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक तथा माजी खासदार राजू शेट्टी यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. "सरकारकडून कर्जमाफीवर फक्त टाईमपास सुरू आहे. एक तारीख संपली की दुसरी तारीख दिली जाते. हे 'तारीख पे तारीख'चे नाटक असून, शेतकऱ्यांची क्रूर थट्टा सुरू आहे," असा घणाघाती आरोप त्यांनी केला.

### शेतकऱ्यांच्या अपेक्षा पुन्हा अधांतरी

एकीकडे नापिकी, वाढते उत्पादन खर्च, कर्जाचा डोंगर आणि आर्थिक संकटाचा सामना करणारा शेतकरी कर्जमाफीच्या आशेवर आहे. मात्र सरकारकडून वारंवार बदलणाऱ्या मुदतींमुळे शेतकऱ्यांचा संयम सुटत चालला आहे. जूनअखेर कर्जमाफीचा शब्द देणारे सरकार तो पाळू शकले नसल्याने आता ५ जुलैची नवी डेडलाईन तरी पूर्ण होणार का? याकडे राज्यातील लाखो शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या राजीनाम्यासाठी विधान भवनासमोर आंदोलन

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** टीईटी पेपरफुटी प्रकरणी युवक काँग्रेस आक्रमक झाली असून सलग तिसऱ्या दिवशी आंदोलन करून भाजपा महायुती सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी विधानभवनाच्या प्रवेश द्वारावर आंदोलन करत शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राजीनामा देण्याच्या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी केली.




रविवारी होणाऱ्या टीईटीचा पेपर शनिवारी ठाण्यात फुटल्याने ही परीक्षा रद्द करावी लागली, यामुळे लाखो परिक्षार्थींचे नुकसान झाले आहे. भारतीय जनता पक्ष महायुतीचे सरकार एक परिक्षाही व्यवस्थित घेऊ शकत नाही. सातत्याने पेपर फुटत असून प्रामाणिक विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होते आहे. मागील महिन्यात नीटचा पेपर फुटल्याने देशभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असतानाच टीईटीचाही पेपर फुटल्याने सर्वत्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

काँग्रेस पक्षाने पेपरफुटीप्रकरणी आक्रमक भूमिका घेत भाजपा सरकारला सळो की पळो करून सोडले आहे. काल रात्री सागर साळुंखे यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेसची विद्यार्थी संघटना NSUI ने शिक्षणमंत्री दादा भुसे यांची गाडी अडवून काळे झेंडे दाखवण्यात आले, त्याआधी रविवारी मुंबई युवक काँग्रेस अध्यक्षा झीनत शबरीन यांच्या नेतृत्त्वाखाली शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या सरकारी निवासस्थावर हल्लाबोल केला. आणि आता पुन्हा युवक काँग्रेसने आंदोलन केले आहे. शिक्षणमंत्री दादा भुसे यांचा राजीनामा घेतल्याशिवाय हे आंदोलन थांबणार नाही, असा इशारा युवक काँग्रेसने दिला आहे.

## राज्यमाता गोमाता संवाद यात्रेत ज्येष्ठ समाजसेवक रुद्रप्पा बिराजदार यांचा विशेष सत्कार

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभर आयोजित करण्यात आलेल्या 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रे'चे सोलापूर जिल्ह्यात उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शहरातील निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे झालेल्या प्रमुख कार्यक्रमात गोसंवर्धन, गोसेवा, जैविक शेती, पर्यावरण संवर्धन आणि भारतीय संस्कृतीतील गोमातेचे महत्त्व यावर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हाभरातील गोशाळा संचालक, गोरक्षक, गोभक्त आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते ज्येष्ठ समाजसेवक रुद्रप्पा बिराजदार यांचा झालेला सन्मान. सोलापूर जिल्ह्यात यात्रेचे आगमन झाल्यापासून ते कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडण्यापर्यंत त्यांनी केलेल्या नियोजनबद्ध कामाची आणि समन्वयाची दखल घेत महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखरजी मुंदडा यांच्या हस्ते त्यांचा शेणाची घडी देऊन विशेष सत्कार करण्यात आला. भारतीय संस्कृतीत शेणाला पवित्र, पर्यावरणपूरक आणि कृषी संस्कृतीचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे या अनोख्या सन्मानामुळे उपस्थितांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात गोसंवर्धन ही केवळ धार्मिक भावना नसून पर्यावरण संरक्षण, नैसर्गिक शेती, सेंद्रिय खतांचा वापर, ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करणे आणि शाश्वत विकास यासाठी अत्यंत महत्त्वाची चळवळ असल्याचे सांगितले. गोमातेच्या संरक्षणासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

## सोलापूरवर अन्याय?
### चिपी, नांदेड, संभाजीनगरसाठी विमाने वळविल्याचा दावा




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील काही शहरांत नव्याने विमानसेवा सुरू करण्याच्या हालचालींमुळे सोलापूर येथील विमानसेवा काही महिन्यांसाठी बंद ठेवण्यात आल्याची चर्चा रंगू लागली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, उपलब्ध विमानांची संख्या मर्यादित असल्याने छत्रपती संभाजीनगर, नांदेड आणि सिंधुदुगार्तील चिपी विमानतळावर सेवा सुरू करण्यासाठी विमान कंपन्यांवर दबाव टाकण्यात आल्याचा दावा केला जात आहे. मात्र, याबाबत अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

यंदाच्या पावसाळ्यात दृश्यमानता कमी असल्याचे कारण देत विमान कंपन्यांनी सोलापूर-गोवा आणि सोलापूर-मुंबई या दोन्ही मार्गावरील सेवा तात्पुरती स्थगित केली आहे. मात्र, गेल्या वर्षी अधिक पाऊस होऊनही किरकोळ अडथळे वगळता विमानसेवा नियमित सुरू होती. त्यामुळे यंदा केवळ दृश्यमानतेचे कारण देऊन सेवा बंद करण्याचा निर्णय संशयास्पद असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

सोलापूर-गोवा विमानसेवा १८ जूनपासून बंद करण्यात आली, तर सोलापूर-मुंबई विमानसेवाही ३० जूनपासून स्थगित झाली आहे. दरम्यान, १६ सप्टेंबरपासून सोलापूर-मुंबई विमानसेवा पुन्हा सुरू होणार असून त्यासाठी बुकिंग सुरू करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, दोन्ही मार्गावरील विमानसेवांना सुमारे ८५ टक्के प्रवासी प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले जात आहे. तसेच, प्रादेशिक हवाई संपर्क योजनेअंतर्गत काही रिक्त जागांसाठी सरकारकडून विमान कंपनीला अनुदानही दिले जाते. त्यामुळे चांगला प्रतिसाद मिळत असतानाही सेवा बंद करण्यामागे केवळ कमी दृश्यमानता हेच कारण असल्याबाबत प्रवाशांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

दरम्यान, सोलापूरची विमानसेवा बंद ठेवून इतर शहरांत नव्याने सेवा सुरू करण्यामागे शासनाचे धोरण असल्याचा दावा काही सूत्रांकडून केला जात असला, तरी याबाबत शासन किंवा संबंधित विमान कंपन्यांकडून कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही.

## राज्यात 5 दिवस अतिमुसळधार पाऊस

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने काहीशी विश्रांती घेतली होती पण आता पुन्हा एकदा मान्सून सक्रिय होण्याची चिन्हे दिसत आहेत. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यात पुढील चार ते पाच दिवस पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता असून विशेषतः कोकण किनारपट्टी आणि घाटमाथा परिसरात मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

कोकण किनारपट्टीसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. काही जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या कालावधीत अनेक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे, तर काही भागांत तुरळक स्वरूपाचा पाऊसही अनुभवायला मिळू शकतो. मात्र, घाटमाथा आणि किनारपट्टी भागात पावसाचा जोर अधिक राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार, ३ जुलै रोजी बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता आहे. या प्रणालीचा परिणाम राज्यातील हवामानावर होणार असून ३ जुलैनंतर महाराष्ट्रात पावसासाठी अधिक अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे जुलैच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील अनेक भागांत चांगला पाऊस होण्याची अपेक्षा आहे.

यंदा जून महिन्यात महाराष्ट्रात मान्सूनचा प्रभाव सर्वच ठिकाणी जाणवला नाही. अनेक जिल्ह्यांमध्ये अपेक्षेपेक्षा कमी पाऊस नोंदविण्यात आला. राज्यात जून महिन्यात सरासरीच्या तुलनेत सुमारे ५० टक्के पावसाची तूट नोंदवली गेली आहे. देशपातळीवरही परिस्थिती फारशी वेगळी नसून जून महिन्यात देशात सरासरीपेक्षा सुमारे ४० टक्के कमी पाऊस झाला आहे.

मात्र, अलीकडच्या काळात ढगांची तीव्रता वाढल्यामुळे मान्सूनने पुन्हा गती घेतली आहे. मान्सूनने मध्य प्रदेश, संपूर्ण छत्तीसगड आणि बिहारमधील बहुतांश भाग व्यापला आहे. तरीदेखील देशातील काही भागांमध्ये अद्याप मान्सून पोहोचलेला नाही.

दरम्यान, पुढील काही दिवसांत राज्यातील पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासन आणि हवामान विभागाकडून करण्यात आले आहे. विशेषतः किनारपट्टी आणि डोंगराळ भागातील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## आषाढीपूर्वी रेल्वे सज्ज; सुरक्षा, गर्दी व्यवस्थापन आणि प्रवासी सुविधांचा आढावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी वारीसाठी देशभरातून लाखो वारकरी पंढरपूरकडे रवाना होत असल्याच्या पार्श्वभूमीवर सोलापूर रेल्वे विभाग सज्ज झाला आहे. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांनी दोन दिवसांचा पाहणी दौरा करून सुरक्षा व्यवस्था, प्रवासी सुविधा आणि पायाभूत कामांचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

या दौऱ्यात त्यांनी लातूर रोड-कुडुर्वाडी-मिरज या सुमारे ३८५ किलोमीटर रेल्वे मार्गाची पाहणी केली. यावेळी सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांसाठी रेल्वे प्रशासनाची तयारी, स्थानकांवरील गर्दी व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच अन्य प्रवासी सुविधांवर विशेष भर देण्याच्या सूचना महाव्यवस्थापकांनी दिल्या. याशिवाय लातूर येथील मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरी, वॉशिंग-कम-पिट लाईन आणि अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचीही त्यांनी पाहणी केली.



लातूर रोड-कुर्डुवाडी-मिरज मार्गाच्या दुहेरीकरणासह नवीन ब्लॉक स्थानके आणि कुडुर्वाडी जंक्शनवरील इंजिन रिव्हर्सल टाळण्यासाठी प्रस्तावित कॉर्ड लाईन प्रकल्पाबाबतही चर्चा करण्यात आली. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर रेल्वेगाड्यांचा वेग वाढण्यास आणि विलंब कमी होण्यास मदत होणार असल्याचे सांगण्यात आले. कुर्डुवाडी येथे महाव्यवस्थापकांनी 'कवच' सुरक्षा प्रणाली कार्यालय आणि टीआरडी डेपोला भेट देऊन आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाची माहिती घेतली.

रेल्वेने विकसित केलेल्या सेक्शन इन्सुलेटर अलाइनमेंट जिग आणि टॉवर वॅगनमधील अँटी-थेफ्ट अलार्म या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. तसेच पूल, बोगदे आणि सिग्नलिंग यंत्रणेची पाहणी करून सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड न करण्याच्या स्पष्ट सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी येडशी रेल्वे स्थानकावरील सुविधांचेही त्यांनी कौतुक करत तेथील व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त केले.




## संपादकीय

# चिमुरडीला न्याय; आता समाजालाही जागे होण्याची गरज

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या निष्पाप चिमुरडीवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करणाऱ्या आरोपी भीमराव कांबळे याला विशेष सत्र न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली. हा निकाल केवळ एका गुन्हेगाराला झालेली शिक्षा नाही, तर न्यायव्यवस्थेने वेळेत आणि प्रभावीपणे काम केल्यास पीडितेला न्याय मिळू शकतो, याचा ठोस संदेश देणारा आहे. गुन्हा घडल्यापासून अवघ्या दोन महिन्यांत आणि न्यायालयीन प्रक्रियेत केवळ १६ दिवसांत ५५ साक्षीदारांची साक्ष नोंदवून खटल्याचा निकाल लागणे, ही महाराष्ट्राच्या न्यायिक इतिहासातील अभूतपूर्व घटना मानावी लागेल.

या खटल्यात विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे, विशेष सरकारी वकील ॲड. अजय मिसर, त्यांचे सहकारी ॲड. प्रथमेश शिंगणे, तपास अधिकारी विजयमाला पवार, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल्ल आणि संपूर्ण तपास पथकाने दाखवलेली तत्परता विशेष कौतुकास पात्र आहे. फॉरेन्सिक पुरावे, सायबर तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, जलद आरोपपत्र आणि सलग न्यायालयीन सुनावणी यामुळे हा खटला विक्रमी वेळेत निकाली निघाला. अशा समन्वयातूनच न्यायव्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होतो.

परंतु या निकालाचे स्वागत करताना मूळ प्रश्न विसरून चालणार नाही. एका साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर एवढे अमानुष अत्याचार घडूच कसे शकतात? समाजात इतकी विकृत मानसिकता वाढत आहे का, हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे. न्यायालयाने शिक्षेचा निकाल दिला असला, तरी त्या निष्पाप बालिकेचे आयुष्य परत येणार नाही. तिच्या कुटुंबाच्या आयुष्यात निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही.

या प्रकरणातील आरोपी हा पहिल्यांदाच गुन्हा करणारा नव्हता. यापूर्वीही त्याच्यावर महिलांवर आणि अल्पवयीन मुलींवर अत्याचार करण्याचे प्रयत्न केल्याचे आरोप होते. म्हणजेच समाजात वावरणाऱ्या अशा विकृत प्रवृत्तींची वेळेत ओळख करून त्यांच्यावर प्रभावी कारवाई होणे किती आवश्यक आहे, हे या प्रकरणाने पुन्हा अधोरेखित केले आहे. अशा व्यक्तींना मोकळे रान मिळाल्यास त्याचे परिणाम किती भीषण होऊ शकतात, याचे हे जिवंत उदाहरण आहे.

आपल्या देशात खटले वर्षानुवर्षे प्रलंबित राहण्याची परंपरा निर्माण झाली आहे. अनेकदा पीडित व्यक्ती न्यायाच्या प्रतीक्षेतच आयुष्य घालवतात. काही प्रकरणांमध्ये तर दशकानुदशके न्यायालयीन प्रक्रिया सुरू राहते. नुकतेच एका न्यायालयाने तब्बल सत्तर वर्षे जुन्या खटल्याचा निकाल दिला. त्या खटल्याचा निकाल देणारे न्यायाधीश खटला दाखल झाला तेव्हा जन्मालाही आले नव्हते, ही वस्तुस्थिती न्यायव्यवस्थेतील विलंब किती गंभीर आहे, हे दाखवून देते. अशा परिस्थितीत नसरापूर प्रकरणातील वेगवान सुनावणी आशादायी ठरते.

निर्भया प्रकरण, कोलकात्यातील आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालयातील घटना, बदलापूरमधील अल्पवयीन मुलींवरील अत्याचार आणि अशा अनेक घटनांनंतर देशभर संतापाची लाट उसळली. कठोर कायदे करण्यात आले, पोक्सोसारख्या कायद्यांना अधिक बळ देण्यात आले. मात्र केवळ कठोर कायदे करून उपयोग होत नाही. त्यांची प्रभावी आणि तातडीची अंमलबजावणीही तितकीच आवश्यक असते. नसरापूर प्रकरणाने हे सिद्ध करून दाखवले की इच्छाशक्ती, समन्वय आणि कार्यक्षमता असेल तर न्याय लवकर मिळू शकतो.

न्यायाधीशांनी आपल्या निकालात नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक खटल्यात अशी गती राखणे हे स्वप्न वाटू शकते. परंतु हे स्वप्न अशक्य नाही. समाजमनातील संताप पाहून एका प्रकरणात जर संपूर्ण यंत्रणा वेगाने काम करू शकते, तर प्रत्येक गंभीर गुन्ह्यात अशीच तत्परता का दाखवता येऊ नये? न्यायाला गती मिळाली तर गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती निर्माण होईल आणि पीडितांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होईल.

घटनेनंतर संतप्त नागरिकांनी मुंबईबेंगळुरू महामार्ग रोखून आरोपीला ताब्यात देण्याची मागणी केली होती. हा उद्रेक कायद्यावरील अविश्वासातून निर्माण झालेला होता. जेव्हा न्याय मिळण्यास विलंब होतो, तेव्हा लोकांमध्ये असंतोष वाढतो. परंतु या प्रकरणात न्यायालयाने कायद्याच्या चौकटीत राहून दिलेला जलद निर्णय हा लोकशाही व्यवस्थेच्या सामर्थ्याचा पुरावा आहे. न्याय हा कायद्याच्या मार्गानेच मिळायला हवा, हा संदेशही या निकालातून अधोरेखित झाला आहे.

मात्र या घटनेचा सर्वात मोठा धडा समाजासाठी आहे. गुन्हा घडल्यानंतर फाशीची शिक्षा देणे हा अंतिम उपाय असू शकतो; पण गुन्हे घडूच नयेत यासाठी समाजाने अधिक सजग होण्याची गरज आहे. विकृत मानसिकतेच्या व्यक्तींना वेळेत ओळखणे, मुलांच्या सुरक्षेबाबत जागरूकता वाढवणे, संशयास्पद वर्तनाची माहिती तातडीने पोलिसांना देणे, कुटुंब आणि समाजात संवेदनशील वातावरण निर्माण करणे, ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

तपास अधिकारी विजयमाला पवार यांनी, "समाजाचा एक भाग म्हणून मी त्या चिमुरडीची माफी मागते; एक आई आणि तपास अधिकारी म्हणून तिला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला," असे भावनिक शब्द उच्चारले. ही भावना केवळ एका अधिकाऱ्याची नसून संपूर्ण समाजाची असली पाहिजे. कारण प्रत्येक निष्पाप बालकाची सुरक्षा ही केवळ पालकांची नव्हे, तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

नसरापूर प्रकरणाचा हा ऐतिहासिक निकाल देशातील प्रत्येक न्यायालय, प्रत्येक पोलीस ठाणे आणि प्रत्येक तपास यंत्रणेसाठी आदर्श ठरावा. जलद तपास, सक्षम पुरावे, वेळेत सुनावणी आणि कठोर शिक्षा या चौकटीत न्यायव्यवस्था सातत्याने काम करू लागली, तर गुन्हेगारांना कायद्याची खरी भीती वाटेल. परंतु त्याचबरोबर समाजानेही आपल्या संवेदनशीलतेची परीक्षा द्यावी लागेल. अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी प्रत्येकाने सजग पालक, जबाबदार नागरिक आणि संवेदनशील समाजघटक म्हणून आपली भूमिका पार पाडली, तरच त्या निष्पाप चिमुरडीला खरी श्रद्धांजली ठरेल.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ ही ग्रामीण महाराष्ट्राचा कणा ठरणार

महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा म्हणजे शेतकरी. शेतीवर अवलंबून असलेल्या लाखो कुटुंबांचे जीवन निसर्गाच्या लहरीपणावर ठामपणे टिकून असते. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्ती केवळ पिकांचे नुकसान करतात असे नाही तर त्याचबरोबर संपूर्ण अर्थचक्र हादरवतात. पिके हातातून निसटली की उत्पन्न घटते, उत्पन्न घटले की घरखर्च आणि शेतीचा पुढचा हंगाम या दोन्ही बाबींमध्ये तूट निर्माण होते. या तुटीची भरपाई करण्यासाठी अनेक शेतकरी पुन्हा कर्जाकडे वळतात. आणि कर्जाची परतफेड वेळेवर झाली नाही तर थकबाकी वाढते. परिणामी, बँकिंग संस्थांमधून नव्याने कर्ज मिळणे कठीण होते. अशा प्रकारे शेतकरी कर्जबाजारीपणाच्या दुष्टचक्रात अडकतो.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाकडून गेल्या काही वर्षात शेतकरी हिताच्या अनेक योजना राबविण्यात आल्या. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना (२०१७), महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना (२०१९) आणि त्याअंतर्गत राबविल्या गेलेल्या प्रोत्साहनपर लाभ योजना (२०२२) या सर्व योजनांचा उद्देश मूलतः शेतकऱ्यांना दिलासा देणे हा होता. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती पाहिली तर थकबाकी आणि कर्जबाजारीपणा हा मुद्दा अजूनही पूर्णपणे संपलेला दिसत नाही. नैसर्गिक आपत्तींचा प्रभाव सतत राहतो, त्यातून निर्माण होणारी अनिश्चितता शेतकऱ्यांना वारंवार संकटात टाकते. त्यामुळे केवळ एकदाच कर्जमुक्ती दिली तरी पुढील हंगामात पुन्हा कर्जाचा भार वाढू नये, परतफेडीसाठी शिस्त निर्माण व्हावी आणि बँकिंग यंत्रणा देखील सक्षम व्हावी, असा अधिक व्यापक आराखडा आवश्यक ठरतो.

याच गरजेतून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' हा निर्णय समोर येतो. सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री महोदयांनी या योजनेची घोषणा केली. या योजनेचा सूर एकाच वेळी दोन दिशांना आहे— थकबाकीदार शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दिलासा, आणि नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक प्रोत्साहन देऊन दीर्घकाळ टिकणारी वित्तीय शिस्त निर्माण करणे.

**योजनामागची भूमिका : केवळ कर्जमाफी नाही, शेतकऱ्यांचा आत्मविश्वास-**

शेतकरी कर्जमाफीच्या योजनांबाबत समाजात अनेकदा एकच प्रश्न उभा राहतो— कर्जमाफी दिली की प्रश्न सुटतो का? पण शेतकरी वास्तव वेगळे आहे. शेतकऱ्याचे आर्थिक चक्र शेतीच्या उत्पन्नावर चालते. आणि शेतीचे उत्पन्न हे निसर्गावर अवलंबून असते. त्यामुळे कर्जमाफी ही केवळ आर्थिक व्यवहार नसून शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासाचा प्रश्न बनतो. एकदा थकबाकी कमी झाली, कर्जाचा ताण उतरला आणि पुढील हंगाम नियोजनबद्ध पद्धतीने हाताळता आला, तर शेतकरी पुन्हा उत्पादनाच्या वाटेवर येतो.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' या संदर्भात अधिक समजूतदार दृष्टी दाखवते. योजनेत दोन मुख्य प्रवाह दिसतात. पहिला प्रवाह थकबाकीदारांना कर्जमुक्ती देतो. दुसरा प्रवाह नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देतो. यामुळे योजना एकाच वेळी 'सुट' आणि 'शिस्त' या दोन्ही गोष्टी साध्य करण्याचा प्रयत्न करते.

**कर्जमुक्तीचे केंद्र : पात्रता कालावधी आणि थकबाकीची नेमकी व्याख्या-**

या योजनेत कर्जमुक्ती देताना पात्रता कालावधी स्पष्ट करण्यात आला आहे. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान घेतलेले अल्पमुदत पीक कर्ज या कर्जमुक्तीच्या कक्षेत येते. अशा प्रकारे योजनेचा लाभ मनमानीने देण्याऐवजी कर्ज कोणत्या कालावधीत घेतले आणि ते कोणत्या स्वरूपात आहे, याची मांडणी करण्यात आली आहे.

त्यानंतर थकबाकी स्थितीच्या संदर्भात देखील स्पष्टता आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ अखेर परतफेड न झालेली कर्जे योजनेच्या निकषांत बसतात. म्हणजेच लाभ देण्यासाठी वेळेची आणि थकीतपणाची निकषबद्ध मांडणी आहे.

सर्वसाधारण मर्यादा अशी की प्रति शेतकरी २ लाखांपर्यंत कर्जमुक्ती दिली जाणार आहे. ही मर्यादा महत्त्वाची ठरते कारण ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती वेगवेगळी असते. काही शेतकऱ्यांचे थकबाकी कर्ज तुलनेने कमी असते, तर काही शेतकऱ्यांवर अधिक भार असतो. प्रति शेतकरी २ लाखांपर्यंत कर्जमुक्ती ही मर्यादा लाभाची व्याप्ती निश्चित करून शेतकऱ्यांना वास्तविक दिलासा देण्याचा हेतू दर्शवते.

**महात्मा फुले योजनेतील लाभार्थींसाठी विशेष तरतूद-**

योजनेमध्ये एक विशेष घटक आहे—महात्मा फुले योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी. अशा शेतकऱ्यांना ५० हजारांपर्यंत कर्जमुक्ती देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. याचा अर्थ असा की पूर्वीच्या योजनांच्या लाभार्थ्यांना पूर्णपणे बाहेर ठेवून नवीन योजना सुरू न करता, सातत्य राखण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या तरतुदीमुळे एकीकडे ज्यांनी पूर्वी योजनांचा लाभ घेतला त्यांच्यावरचा कर्जाचा भार पुन्हा हलका करण्याचा मार्ग तयार होतो, तर दुसरीकडे लाभार्थी समुदायामध्ये योजनेचा स्वीकार वाढण्याची शक्यता निर्माण होते.

**एकवेळ समझोता (OTS)-**

शेतकऱ्यांपैकी काहींची थकबाकी ही २ लाखांच्या पलीकडेही जाते. अशा परिस्थितीत केवळ थेट कर्जमुक्ती देण्याने आर्थिक ताळमेळ पूर्णपणे बसत नाही, आणि बँकिंग संस्थांच्या दृष्टीने देखील हे व्यवहार गुंतागुंतीचे ठरू शकतात. याच कारणासाठी योजनेत एकवेळ समझोता (OTS) हा घटक मांडण्यात आला आहे.

२ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी प्रथम अतिरिक्त रक्कम परतफेड करावी आणि त्यानंतर २ लाखांचा लाभ मिळावा, अशी कार्यपद्धती दिली जाते. म्हणजेच लाभ पूर्णतः 'फुकट' स्वरूपात नसून, अतिरिक्त भार उतरविण्यासाठी शेतकऱ्याकडून प्राथमिक प्रयत्न अपेक्षित आहेत. ही बाब वित्तीय शिस्तीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते.

महात्मा फुले योजनेतील लाभार्थींसाठीही अशाच स्वरूपाची मांडणी आहे. ५० हजारांपेक्षा जास्त थकबाकी असल्यास अतिरिक्त रक्कम परतफेडीनंतर ५० हजारांचा लाभ मिळेल. यामुळे योजनेचे 'पॉइंट-बाय-पॉइंट' तत्त्व स्पष्ट होते—शेतकऱ्यांना जिथे गरज जास्त आहे तिथे लाभ देताना परतफेडीची जबाबदारी देखील निश्चित केली जाते.

**NPA खात्यांवर तोडगा-**

कर्ज थकबाकीत राहिले की ते अनेकदा बँकांच्या वर्गवारीमध्ये NPA स्वरूप धारण करते. अशा खाती व्यवहार्यरित्या सोडविणे कठीण असते, कारण त्यामध्ये कायदेशीर-प्रशासकीय आणि आर्थिक तरतुदींचा समावेश होतो. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' या बाबतीत एक व्यावहारिक मार्ग देते.

योजनेत NPA खात्यांसाठी बँकांशी वाटाघाटी करून सुट देण्याची रक्कम निश्चित केली जाईल, असे नमूद करण्यात आले आहे. याचा अर्थ असा की NPA खात्यांवर उपाययोजना करताना बँकांच्या आर्थिक नियमांनुसार आणि व्यवहार्य आकडेवारीनुसार निर्णय होईल. त्यामुळे शेतकरी आणि बँक दोघांनाही स्वीकारार्ह असा तोडगा मिळण्याची शक्यता वाढते.

**प्रोत्साहनपर लाभ : नियमित परतफेड करणाऱ्यांना ५० हजारांपर्यंत लाभ –**

मागील योजनांनी कर्जमुक्तीचा दिलासा दिला असला तरी थकबाकीचा मूळ कारण कर्ज फेडण्यात सातत्य नसणे आणि नैसर्गिक आपत्तींमुळे उत्पन्न चक्र बिघडणे असे होते. त्यामुळे पुढची गरज अशी उभी राहते की परतफेडीसाठी शेतकऱ्यांमध्ये प्रेरणा निर्माण झाली पाहिजे. याच दृष्टीने या योजनेत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

नियमित परतफेड करणारे शेतकरी २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ या तीन वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत वेळेत परतफेड केल्यास ५० हजारांपर्यंत लाभ घेऊ शकतात. यामुळे लाभ मिळवण्यासाठी केवळ एकदाच नाही तर परतफेडीची सातत्यपूर्ण सवय निर्माण होण्याची शक्यता वाढते.

योजनेमध्ये एक आणखी महत्त्वाची तरतूद आहे—जर कर्ज रक्कम तुलनेने कमी असेल, तर प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम किंवा किमान ५ हजार यापैकी जे अधिक असेल ते लाभ म्हणून मिळेल. ही तरतूद कमी थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनाही न्याय्य लाभ मिळावा यासाठी आहे.

**कोण पात्र नाही? अपात्र व्यक्तींची स्पष्ट यादी-**

कर्जमुक्ती आणि प्रोत्साहनपर लाभ देताना गैरलाभ टाळणे आवश्यक असते. या योजनेत अपात्र व्यक्तींची स्पष्ट यादी दिलेली आहे.

अपात्रांमध्ये मंत्री, खासदार, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य यांचा समावेश आहे. केंद्र/राज्य शासनाचे अधिकारी-कर्मचारी, ज्यांचे वेतन २५,००० पेक्षा जास्त आहे, ते अपात्र ठरतात. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे अधिकारी-कर्मचारी देखील यामध्ये येतात.

शेतीबाह्य उत्पन्नावर आयकर भरणारे, तसेच निवृत्तीवेतनधारक ज्यांचे पेन्शन २५,००० पेक्षा जास्त आहे (माजी सैनिक वगळून) अपात्र ठरतात. सहकारी संस्थांचे पदाधिकारी व अधिकारी ज्यांचे वेतन २५,००० पेक्षा जास्त आहे, तेही पात्र नाहीत. अशा प्रकारची अपात्रता यादी योजनेचा लाभ खरंच शेतीवर अवलंबून असलेल्या गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा यासाठीचा प्रयत्न दर्शवते.

**अंमलबजावणीची पद्धत : ऑनलाईन प्रक्रिया, आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी-**

कोणतीही मोठी योजना यशस्वी होण्यासाठी पारदर्शक अंमलबजावणी अत्यंत महत्त्वाची असते. या योजनेत अंमलबजावणी प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य करण्यात आलेली आहे.

याचा परिणाम म्हणजे लाभार्थी निवडीतील गोंधळ कमी होणे, बनावट/दुबार नोंदी टाळणे, आणि पात्रता निकषांची पडताळणी जलद होणे. आधार आणि ॲग्रीस्टॅकसारखी प्रणाली असल्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीशी संबंधित माहिती आणि लाभाची पात्रता अधिक खात्रीशीर ठरू शकते.

**प्रशासकीय संरचना : मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती**

योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनातील समन्वय महत्त्वाचा असतो. योजनेत मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठीत करण्याची तरतूद आहे. यामुळे धोरणात्मक निर्णय, अंमलबजावणीतील अडथळे, आणि बँकिंग यंत्रणेतील सहकार्य यांवर लक्ष ठेवण्याचा प्रशासकीय आराखडा तयार होतो.

उपसमितीचा आधार असल्यामुळे जिल्हानिहाय अंमलबजावणीतील विसंगती कमी करण्यास मदत होऊ शकते. तसेच शेतकरी स्तरावर लाभ पोहोचण्यासाठी आवश्यक ती शिस्त आणि वेळापत्रक पाळली जाईल, अशी अपेक्षा निर्माण होते.

**योजनेचे महत्त्व : तातडीचा दिलासा आणि दीर्घकालीन सुधारणा**

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' चे महत्त्व तीन पातळ्यांवर ठळक दिसते.

पहिली पातळी म्हणजे कर्जमुक्तीचा थेट दिलासा. २ लाखांपर्यंत कर्जमुक्ती ही थकबाकीदार शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरू शकते. थकबाकी उतरल्यावर बँकिंग व्यवहार सुधारण्यास मदत होते आणि शेतकऱ्याला पुढील हंगामासाठी संधी निर्माण होते.

दुसरी पातळी वित्तीय शिस्तीला प्रोत्साहन. नियमित परतफेड करणाऱ्यांना ५० हजारांपर्यंत लाभ देणे हा केवळ आर्थिक लाभ नाही तर वर्तन बदल घडवण्याचा प्रयत्न आहे. परतफेड वेळेवर केल्यास लाभ मिळतो, ही प्रेरणा पुढील काळात कर्ज परतफेडीची शिस्त वाढवू शकते.

तिसरी पातळी म्हणजे बँकिंग यंत्रणेची क्षमता वाढवणे. ठढअ खात्यांवर वाटाघाटी करून सुट निश्चित करण्याचा मार्ग बँकिंग संस्थांसाठी व्यवहार्य ठरू शकतो. यामुळे कर्ज वसुलीची प्रक्रिया अधिक सुधारू शकते आणि बँकांच्या आर्थिक ताळेबंदावरचा भारही व्यवस्थापित राहू शकतो.

**सामाजिक-आर्थिक परिणाम:**

योजनेचा सर्वात मोठा प्रभाव ग्रामीण समाजजीवनावर पडणार आहे. शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढणे हे एक तात्काळ परिणाम म्हणून दिसू शकते. कर्जाची भीती कमी झाली की शेतकरी पुढील नियोजन करतो—पेरणीचे तंत्र, बियाणे आणि खते निवड, तसेच कर्जाचे पुढील नियोजन याबाबत तो अधिक सजग होतो.

दुसरा परिणाम म्हणजे कर्जबाजारीपणाचे दुष्टचक्र थांबवण्याचा प्रयत्न. जर थकबाकी कमी झाली आणि नियमित परतफेडीसाठी प्रोत्साहन मिळाले, तर भविष्यात कर्ज वाढण्याचा वेग कमी होण्याची शक्यता वाढते.

तिसरा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्था स्थिर होणे असा आहे. ग्रामीण भागात ग्राहकांची खरेदी क्षमता कर्जामुळे कमी होते. कर्जबाजारीपणा वाढला की खर्च मर्यादित होतो आणि स्थानिक अर्थव्यवस्था मंदावते. कर्जाचा भार कमी झाल्यास ग्रामीण रोजगार आणि व्यवहारांना काही प्रमाणात चालना मिळते.

याशिवाय बँकिंग व्यवहार सुधारण्याची देखील शक्यता आहे. बँकांसाठी NPA सोडविण्याच्या स्पष्ट चौकटीमुळे व्यवहारांची गती वाढू शकते.

दीर्घकालीन दृष्टीने या योजनेला शेती आणि पूरक व्यवसायांसाठी धोरणात्मक शिफारसी देण्याचा प्रयत्नही जोडला गेला आहे. केवळ कर्जमुक्ती नव्हे तर शेतीसाठी टिकाऊ धोरणे विकसित करण्याचा विचार पुढे आला तर हा उपक्रम अधिक व्यापक परिणाम देऊ शकतो.

**आव्हाने-**

कोणतीही योजना जाहीर होणे ही सुरुवात असते. प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया आणि अंमलबजावणीची पारदर्शकता ही यशाची गुरुकिल्ली ठरते. ऑनलाईन प्रक्रिया, आधार प्रमाणीकरण, ॲग्रीस्टॅक नोंदणी या बाबी अंमलबजावणीला मजबूत आधार देतात. तरीही विविध स्तरांवर—बँका, जिल्हाधिकारी कार्यालये, कृषी विभाग, आणि शेतकरी नोंदींची छाननी—येथे कार्यक्षम समन्वय आवश्यक असतो.

OTS, NPA खाती, आणि २ लाखांपेक्षा जास्त थकबाकीदार शेतकऱ्यांची वर्गवारी करताना वेळेवर निर्णय झाले, आणि लाभांची रक्कम पारदर्शकरीत्या ठरवली गेली, तर योजनेवरचा विश्वास अधिक दृढ होऊ शकतो.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' ही योजना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी निश्चितच महत्त्वाची ठरू शकते. थकबाकीदार शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्ती देण्याचा थेट दिलासा हा या योजनेचा मुख्य आधार आहे. त्याचबरोबर नियमित परतफेड करणाऱ्यांना ५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देऊन वित्तीय शिस्त निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. ठढअ खात्यांवर वाटाघाटी करून सुट देण्याची तरतूद बँकिंग यंत्रणेला व्यवहार्य आधार देऊ शकते.

शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढणे, कर्जबाजारीपणाचे दुष्टचक्र कमी होणे, ग्रामीण अर्थव्यवस्था स्थिर होणे, आणि बँकिंग व्यवहार अधिक सक्षम होणे अशी दीर्घकालीन उद्दिष्टे साध्य करणारी योजना आहे. त्यामुळे योग्य अंमलबजावणी, वेळापत्रक पाळणे, आणि लाभार्थी निवडीतील पारदर्शकता कायम ठेवली, तर ही योजना ग्रामीण महाराष्ट्राचा खऱ्या अर्थाने कणा ठरणार आहे.

**- सुनील सोनटक्के**
जिल्हा माहिती अधिकारी
सोलापूर

# ५४ मीटर रस्त्यावरील पुलाखाली साचलेल्या पाण्याची महापौरांकडून पाहणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** काल झालेल्या अतिवृष्टीमुळे सोलापूर शहरातील ५४ मीटर रस्ता येथील पुलाखाली मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सोलापूर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने तत्काळ कार्यवाही करत काल रात्रीच पाण्याचा उपसा करून रस्ता वाहतुकीसाठी खुला केला.

आज सकाळी सोलापूर शहराचे महापौर श्री विनायक दादा कोंड्याल यांनी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. यावेळी नगर अभियंता सारिका आकूलवार तसेच सहाय्यक अभियंता श्री प्रकाश दिवानजी उपस्थित होते.पाहणीदरम्यान महापौर श्री विनायक कोंड्याल यांनी अधिकाऱ्यांकडून पाणी साचण्यामागील



कारणांची माहिती घेतली. भविष्यात अशा परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी ५४ मीटर रस्ता परिसरात कायमस्वरूपी आपत्कालीन यंत्रणा उभारण्याचे, तसेच पाणी उपसा करण्यासाठी आवश्यक पंप, यंत्रसामग्री व मनुष्यबळ उपलब्ध ठेवण्याचे निर्देश दिले.

यासोबतच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध भागांमध्येही आपत्कालीन यंत्रणा उभारण्यात येत असून, पाणी साचणाऱ्या ठिकाणी तातडीने पाणी उपसा करता यावा यासाठी आवश्यक यंत्रसामग्री, पंप व कर्मचारी सज्ज ठेवण्याचे आदेश महापौरांनी दिले. नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, पावसाळ्यात वाहतूक सुरळीत राहावी आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देता यावा, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत शहरातील विविध भागांतील परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत आवश्यक त्या सर्व उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्यात येत आहेत.

# 'अमृत'ची आता हरित उर्जा क्षेत्राकडे वाटचाल : राज्यभर 'अमृत ईव्ही चार्जिंग स्टेशन' उभारणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** हरित ऊर्जा, स्वच्छ पर्यावरण आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या "Go Green India" व "सस्टेनेबल मोबिलिटी" संकल्पनेला बळ देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे ने हरित ऊर्जा क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'अमृत'च्या माध्यमातून राज्यभरात ईव्ही (Electric Vehicle) चार्जिंग स्टेशन व्यवसाय प्रोत्साहन उपक्रम राबविण्यात येत आहे.

**युवक, महिला व ग्रामीण उद्योजकांना संधी**

या उपक्रमांतर्गत युवक, महिला उद्योजक, स्वयं सहाय्यता गट, एमएसएमई घटक तसेच ग्रामीण भागातील इच्छुक उद्योजकांना ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन, व्यवसाय सल्ला आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. देशात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर झपाट्याने वाढत असल्याने पेट्रोल पंपाप्रमाणे ईव्ही चार्जिंग स्टेशनचे मोठे जाळे उभारण्याची गरज निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात या क्षेत्रात रोजगार व स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत.

**व्यवसायातील विविध संधी**

ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारणी, संचालन व व्यवस्थापन, चार्जिंग उपकरणांची देखभाल, सौरऊर्जेवर आधारित चार्जिंग सुविधा, ग्रीन एनर्जी सेवा, ईव्ही संबंधित तांत्रिक सेवा, फ्रँचायझी मॉडेल व्यवसाय तसेच ग्रामीण भागात चार्जिंग हब उभारणी अशा विविध क्षेत्रांमध्ये व्यवसायाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. भविष्यात ईव्ही क्षेत्र हे सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या उद्योगांपैकी एक ठरणार असल्याने प्रशिक्षित उद्योजकांना मोठा लाभ मिळणार आहे.

**प्रशिक्षण ते आर्थिक सहाय्य**

'अमृत'च्या या विशेष उपक्रमांतर्गत सहभागी लाभार्थ्यांना ईव्ही क्षेत्राविषयी मूलभूत ते प्रगत प्रशिक्षण, व्यवसाय नियोजन, प्रकल्प अहवाल तयार करणे, चार्जिंग स्टेशन स्थापनेसाठी तांत्रिक मार्गदर्शन, शासनाच्या विविध योजनांची माहिती, बाजारपेठेचा अभ्यास आणि व्यवसाय व्यवस्थापनाचे मार्गदर्शन दिले जाणार आहे. भारतीय स्वदेशी कंपन्या व तज्ञ मार्गदर्शक यांच्या सहाय्याने हा उपक्रम राबवला जाणार आहे. पात्र लाभार्थ्यांना 'अमृत'च्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचाही लाभ मिळणार आहे.

**पात्रता व अर्ज प्रक्रिया**

युवक-युवती, महिला उद्योजक, स्वयं सहाय्यता गट, एमएसएमई उद्योजक, शेतकरी उत्पादक गट, ग्रामीण उद्योजक तसेच स्वतःचा उद्योग सुरू करू इच्छिणारे नागरिक या उपक्रमासाठी पात्र राहतील. इच्छुक उमेदवारांनी 'अमृत'च्या http://mahaamrut.org.in या संकेतस्थळावर 'योजना' विभागातील 'विशेष योजना' मेनू खाली 'EV Charging Station Partner' मध्ये ऑनलाइन अर्ज करावा. अजासीबत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी जिल्ह्यातील 'अमृत' कार्यालयाशी संपर्क साधावा. संकेतस्थळावर सर्व जिल्हा व्यवस्थापकांचे संपर्क क्रमांक उपलब्ध आहेत.

**हरित महाराष्ट्राच्या दिशेने पाऊल**

ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसायामुळे पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेला चालना मिळून हरित ऊर्जा वापर वाढेल. युवक, महिला व ग्रामीण उद्योजकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होतील. पर्यावरण रक्षणाच्या सामाजिक जबाबदारीतून 'अमृत'ने हा अनोखा उपक्रम हाती घेतला असून, यामुळे पर्यावरणाचे रक्षण होण्यासोबतच स्वयंरोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत, असे 'अमृत'कडून सांगण्यात आले.

## वात्रटिका

### मृत्यूदंड सुध्दा कमी

धाक नाही म्हणून की काय
जन्माला येतो असा असूर...
अधूनमधून घडतच असते
कधी बदलापूर कधी नसरापूर...
निष्पाप निरागस चिमुरडीचा
तळतळाट लागलाच पाहिजे...
जेल किंवा आडबाजूला नाही,
चौकात त्याला लटकावला पाहिजे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# नातेपुते महाविद्यालयात विविध उपक्रम राबवून प्रतापसिंह मोहिते पाटील यांची जयंती साजरी



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष लोकनेते प्रतापसिंह मोहिते पाटील,यांची जयंती निमित्त महाविद्यालयामध्ये विविध उपक्रम राबवून साजरी करण्यात आली.त्यानिमित्त महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना यांच्यावतीने परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले, ग्रामीण रुग्णालय नातेपुते व शहरातील विविध रुग्णालयात जाऊन रुग्णांना फळे वाटप करण्यात आली, महाविद्यालयातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते प्रा. डॉ.दत्तात्रय मगर, शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज, यांनी लोकनेते प्रतापसिंह मोहिते पाटील यांचे जीवन कार्य व सध्याची राजकीय परिस्थिती याविषयी मार्गदर्शन केले.पप्पासाहेब हे धाडसी मनमिळाऊ नेते होते. दिलेला शब्द पाळणारे असे महाराष्ट्रातील एकमेव राजकारणी होते, त्यांनी राजकारणापेक्षा समाजकारण मोठ्या प्रमाणात केले. सामान्य कार्यकत्यार्ला राजकारणात आणून मोठी पदे दिली. पप्पासाहेब यांनी आपल्या कारकिर्दीत शैक्षणिक, सामाजिक, कृषी, सहकार, राजकीय, धार्मिक इ. सर्व क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविला. पप्पासाहेबांनी केलेले कार्य कधीही विसरणारे नाही असे मत व्याख्याते प्रा. डॉ. दत्तात्रय मगर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवानराव साळुंखे यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा.डॉ. बाळासाहेब निकम, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राजाभाऊ साठे, आभार प्रा. सतीश चव्हाण यांनी व्यक्त केले. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.उत्तम सावंत, प्रा.बापूराव वाघमोडे,सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी, स्वयंसेवक उपस्थित होते.

# शिक्षण मंत्र्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात येणारी टीईटी परीक्षा पेपर फुटीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर दि.२८ जून रोजी होणारी टीईटी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला,सदर पेपर फुटी मुळे परीक्षार्थी शिक्षकांना मोठा धक्का बसला आहे, सदर पेपर फुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून शिक्षण मंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार शिक्षक सेलच्या वतीने करण्यात आली आहे. या घटनेमुळे परीक्षार्थी शिक्षकांमध्ये सरकार विरोधात मोठा रोष निर्माण झाला आहे.सरकारने या घटनेची गांभीयार्ने नोंद घेऊन निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशीही मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार शिक्षक सेलच्या वतीने करण्यात आली आहे. सध्या शाळा चालू असल्या कारणाने फेरपरीक्षेची काठीण्य पातळी सोपी असावी असेही सुचविण्यात आले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार शिक्षक सेलचे शहराध्यक्ष अश्विन नागणे, प्रा.संभुदेव गावडे, प्रा.मोतिराम दोडमिसे, प्रा.हरीष गरड, प्रा.गिरीष लोंढे, विजय गायकवाड यांची उपस्थिती होती.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देशाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहीर केली आहे, याअनुषंगाने सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने जिल्ह्यातील 7 हजार 694 थकीत कर्जदारांचा तपशील पोर्टलवर अपलोड करण्यात आहे, अशी माहिती सहकारी संस्था सोलापूर चे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी दिली आहे.

सहकार विभागाच्या जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाच्या वतीने या योजनेची प्रभावी, पारदर्शक अंमलबजावणी आणि वेळेत लाभ देण्यासाठी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेला कर्जदारांचा तपशील पोर्टलवर माहिती अपलोड करण्याचे आवाहन केले असता बँकेच्यावतीने संपूर्ण कर्जदार खातेदाराची माहिती पोर्टलवर अपलोड केली आहे. त्याचा तालुकानिहाय तपशील पुढीलप्रमाणे:

उत्तर सोलापूर 156, दक्षिण सोलापूर 306, पंढरपूर 857, सांगोला 472, माळशिरस 1009, बार्शी 344, करमाळा 1003, मोहोळ 726, करमाळा 1002, अक्कलकोट 240, मंगळवेढा 1579.

# सोन्याचे दागिने लंपास करणारा तोतया पोलीस नातेपुते पोलीस ठाण्याच्या ताब्यात




**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** स्वतःला पोलिस असल्याचे भासवून, सरकारने अंगावर सोने घालण्यास बंदी घातली आहे, अशी खोटी बतावणी करत ७६ वर्षीय वृद्ध महिलेचे १ लाख ६६ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने हातचलाखीने लंपास करणाऱ्या मुख्य आरोपीला नातेपुते पोलिसांनी अटक केली.९ जून २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजण्याच्या सुमारास फियार्दी विमल शंकर जैन (रा. नातेपुते) या एसटी स्टँड जवळील अहिल्यादेवी होळकर पुतळ्याजवळ उभ्या असताना मोटारसायकलवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी स्वतःला पोलिस असल्याचे सांगितले. सरकारने अंगावर सोने परिधान करण्यास बंदी घातल्याचे खोटे सांगून त्यांनी वृद्ध महिलेला भीती दाखवली. सुरक्षिततेच्या नावाखाली गळ्यातील सोन्याचे लॉकेट पिशवीत ठेवण्यास सांगत हातचलाखीने दोन सोन्याचे लॉकेट चोरून दोघे पसार झाले. या प्रकरणी नातेपुते पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये २१ ग्रॅम वजनाचे बदाम असलेले सोन्याचे लॉकेट (किंमत ८१ हजार रुपये) आणि २२ ग्रॅम वजनाचे त्रिकोण लोगो असलेले सोन्याचे लॉकेट (किंमत ८५ हजार रुपये) असा एकूण १ लाख ६६ हजार रुपयांचा ऐवज होता. सपोनी विशाल वायकर यांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तांत्रिक तपास व गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली. त्यानुसार मुख्य आरोपी शहाजूर अफसर इराणी (वय ५०, रा. मंगल नगर, अटारी रोड, कल्याण) याला खडकपाडा पोलिसांच्या मदतीने कल्याण येथून ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक विजय कबाडे व उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि विशाल वायकर सफौ. देविदास धोत्रे, पोलीस नाईक राकेश लोहार, रणजीत मदने, असलम शेख, गणेश कापसे तसेच खडकपाडा पोलीस ठाण्याचे (कल्याण) पोलीस उपनिरीक्षक भूषण देवरे, सफौ. सुधीर पाटील, पोपट दुलगुंड यांनी पार पाडली.

# विद्यार्थ्यांना बस सेवेमधून शिक्षणाची नवी प्रेरणा मिळते - मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट शहर व तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेत ये - जा करणारे विद्यार्थी नवीन स्कूल बस मधून सुरक्षितता, शिस्त, वेळेचे महत्त्व आणि शिक्षणाची नवी प्रेरणा घेत असतो . म्हणून या नवीन बसमधून प्रवास करणारा प्रत्येक विद्यार्थी ज्ञान, संस्कार आणि यशाच्या दिशेने वाटचाल करेल असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात शिवपार्वती टूर्स अँड स्कूल बस सर्विस यांच्या नूतन स्कूल बसचे पूजन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी मालक व चालकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, विवेकानंद परिवाराचे सदस्य गुरुपाद आळगी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, उद्योजक आनंद शिवकर्ण जकापुरे, निखिल जकापुरे आदी उपस्थित होते.



पुढे ते म्हणाले की, आजचा दिवस अत्यंत आनंदाचा आहे, विद्यार्थ्यांच्या सुरक्षित, आरामदायी आणि वेळेवर प्रवासासाठी नवीन स्कूल बसचे उद्घाटन होत आहे, ही बस केवळ एक वाहन नसून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाला अधिक सुरक्षित आणि सुलभ बनवणारे एक महत्त्वाचे साधन आहे, या बसमधून प्रवास करणारा प्रत्येक विद्यार्थी ज्ञान संस्कार आणि यशाच्या दिशेने वाटचाल करेल असा विश्वास वाटतो. प्रारंभी आनंद जकापुरे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुरुपाद आळगी यांनी केले. आभार निखिल जकापुरे यांनी मानले.

**नवीन बस मध्ये आरामदायी आसन व्यवस्था व सी सी कॅमेरा**

पालक अत्यंत विश्वासाने मुला मुलींची जबाबदारी आमच्यावर सोपवितात त्यामुळे नवीन बस मध्ये आरामदायी आसन व्यवस्था व सी सी कॅमेरा उपलब्ध करण्यात आली आहे. सुरक्षित प्रवास हेच आमचे ध्येय आहे असे यावेळी उद्योजक आनंद शिवकर्ण जकापुरे व निखिल जकापुरे यांनी सांगितले.


## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

साईनाथ सिध्दु गुंजाळ वय - ४३ वर्षे. धंदा- मजुरी रा. अंबरनाथ जि.ठाणे } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामपंचायत चिंचोलीकाटी ता. मोहोळ } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांचे आजोबा बाबशा बापू पवार मृत्यू दिनांक- ५/६/१९९० व आजी रुक्माबाई बाबशा पवार मृत्यू दि.१०/५/१९९२ रोजी मौजे चिंचोलीकाटी ता. मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे बाबशा बापू पवार, रुक्माबाई बाबशा पवार यांच्या मृत्यू बाबत सामनेवाला यांच्याकडे मृत्यू दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे 'नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९९० व मे १९९२ चे अभिलेखात अर्जदार यांचे आजी व आजोबा यांचा मृत्यूनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात मृत्यूनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.१५/७/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे मृत्यू दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.३०/६/२०२६

**हुकूमावरुन**

## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

सुनील वामन गायकवाड वय-३७ वर्षे. धंदा- मजुरी रा. मोहोळ जि.सोलापूर } **अर्जदार**

**विरुध्द**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची सुनील वामन गायकवाड जन्म दि.१/१/१९८९ रोजी मौजे मोहोळ ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदारने त्याबदल सदर या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील सुनील वामन गायकवाड यांच्या जन्माबाबतसामनेवाला यांच्या कडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमूद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्याच्या कडील माहे जानेवारी १९८९ च्या अभिलेखात अर्जदार यांची जन्म नोद नसल्याचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या. में कोर्टात सामनेवाला यांच्यकडील आभिलेखात जन्माचीनोंद करून घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि. १५/७/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.३०/६/२०२६

**हुकूमावरुन**

## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

यश सुरेश गुरव वय - २७ वर्षे. धंदा- शिक्षण रा. मोहोळ जि.सोलापूर } **अर्जदार**

**विरुध्द**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची यश सुरेश गुरव जन्म दि. १४/८/१९९९ रोजी मौजे मोहोळ ता. मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे.

अर्जदारने त्याबदल सदर या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील यश सुरेश गुरव यांच्या जन्माबाबतसामनेवाला यांच्या कडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमूद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्याच्या कडील माहे ऑगष्ट १९९९ च्या अभिलेखात अर्जदार यांची जन्म नोद नसल्याचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या. में कोर्टात सामनेवाला यांच्यकडील आभिलेखात जन्माचीनोंद करून घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१५/७/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.३०/६/२०२६

**हुकूमावरुन**

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र/अभिलेख/कावि/४०७/२०२५

**मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

नागनाथ शंकर सलगर, वय-५२ वर्षे, धंदा-शेती, रा. कुरुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामपंचायत कुरुल ता. मोहोळ, जि. सोलापूर (अर्जाची नोटीस ग्रामसेवक कुरुल, ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी). } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांचे मयत वडिल शंकर गेना सलगर यांचा मृत्यू दि.०६/०१/२०१६ रोजी मौजे कुरुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. तरी, त्यांच्या मृत्यूची नोंद सामनेवाला यांचेकडे होऊन, तसा मृत्यू दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी अर्जदार यांचे मागणीप्रमाणे अर्जदार यांचे वडिल शंकर गेना सलगर यांचा मृत्यू दाखला देण्यास कोणाचीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी हे जाहिर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झ लेपासून ३० दिवसाच्या आत सदर प्रकरणाचे कामी पुढील नेमलेली ता.१७/७//२०२६ रोजी अथवा त्यापुर्वी स्वतः अगर वकीला मार्फत लेखी म्हणणे दाखल करावे. सदर मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास अर्जदाराच्या अर्जावर पुढील योग्य ते हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी. जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे. ता. ३०/६/२०२६

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन मा. तहसिलदार सो, मोहोळ**

## जाहीर प्रसिध्दीकरण कि. अर्ज नं. ३८५/२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे न्यायालयात-**

सानिका आण्णासाहेब घोडके वय- १९ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. कुरूल ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत येवती, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार सानिका आण्णासाहेब घोडके ही मौजे येवती, ता. मोहोळ येथे त्यांचे मामाचे राहते घरी दि. ०९/१०/२००६ रोजी जन्मलेली आहे. त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत येवती ता. मोहोळ, जि. सोलापूर यांचे जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. अर्जदाराच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत येवती चे जन्माचे रजिस्टरला व्हावे याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे. त्याअर्थी अर्जदार सानिका आण्णासाहेब घोडके याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत येवती यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत अथवा दि. १४/०७/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत म्हणणे न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जातील मागणी प्रमाणे पुढील जरुर ते आदेश होतील याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता. ३०/०६/२०२६

(शिक्का) **लिपीक तहसिल कार्यालय, मोहोळ.**

## जाहीर प्रसिध्दीकरण क्र.अभि/कावि नं.३८४/२०२६

**मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

श्री. सुशांत सुधाकर साळुंके वय- १९ वर्षे, धंदा- शेती, रा. कुरुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामपंचायत कुरुल, ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत कुरुल, यांचेवर बजावविण्यात यावी.) } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा जन्म ता. १८/०६/२००८ रोजी मौजे कुरुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदार यांच्या जन्म दाखल्याची ता. १८/०६/२००८ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून २००८ चे अभिलेखात अर्जदार म्हणजेच सुशांत सुधाकर साळुंके यांचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. १४/०७/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता३/०६/२०२६

(शिक्का) **लिपीक**

## जाहीर प्रसिध्दीकरण जन्म-मृत्यु नोंद अर्ज ३३०/२०२६

**मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

उषा मोहन जाधव, } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामविकास अधिकारी (ग्रामसेवक) ग्रामपंचायत, सय्यद वरवडे, ता. मोहोळ, जि. सोलापूर } **सामनेवाला**

ज्या अर्थी वर नमुद अर्जदार यांच्या मुलाचा जन्म ता. १३/०३/२०१० रोजी मौजे सय्यद् वरवडे ता. मोहोळ,जि. सोलापूर येथे झाला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद सामनेवालानी जन्म-मृत्यु रजिष्टरला जन्म तारखेपासुन एक महिन्याचे आत करणे आवश्यक होते. परंतु अर्जदार व अर्जदाराचे पती हे कामानिमित्त बाहेर गावी गेल्यामुळे अर्जदाराच्या मुलाच्या जन्माची नोंद करु शकले नाहीत. त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश सामानेवाला यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल करुन केलेली आहे. त्याअर्थी तमाम लोकांस सदर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार यांच्या मुलाचा जन्म ता. १३/०३/२०१० रोजी झाल्यामुळे त्यांच्या जन्माची नोंद सामानेवाला चे जन्म-मृत्यु रजिष्टरला रेकॉर्डवर घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांचे आत अगर सदर अर्जाचे कामी नेमलेली तारीख १५/०७/२०२६ रोजी आपली तक्रार / हरकत स्वतः अगर वकिलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करुन सामानेवाला यांना अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दि. १३/०३/२०१० रोजी झाल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी. हे जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे. ता. ३०/०६/२०२६.

(शिक्का) **क. लिपिक मा. तहसिलदार सो, मोहोळ**


# घरफोडी करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भरवस्तीत बंद घर फोडून लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास करणाऱ्या आंतरराज्य घरफोड्या टोळीचा सोलापूर शहर गुन्हे शाखेने पदार्फाश केला आहे. या कारवाईत दोन सराईत चोरांसह चोरीचा माल खरेदी करणाऱ्या सराफांनाही अटक करण्यात आली असून, एकूण १० लाख ६३ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. २५ मेच्या रात्री ते २६ मेच्या पहाटे दरम्यान जुळे सोलापूर येथील म्हेत्रे टॉवर परिसरातील एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. लोखंडी कपाटातून २१७ ग्रॅम सोन्याचे दागिने व १ लाख २० हजार रुपयांची रोख रक्कम असा ऐवज चोरून नेण्यात आला होता. याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील व सहाय्यक पोलीस आयुक्त दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांनी तपासाची सूत्रे हाती घेतली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेश खेडकर यांच्या पथकाने घटनास्थळ व परिसरातील तब्बल ३०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी पुण्यातील हडपसर येथे छापा टाकून मुख्य आरोपी सुरजितसिंग राजपालसिंग टाक (वय ३५) याला अटक केली. चौकशीत त्याने साथीदार मंजित कुमार (रा. उत्तर प्रदेश) याच्या मदतीने घरफोडी केल्याची कबुली दिली.

या कारवाईत पोलिसांनी १५६.५ ग्रॅम सोन्याचे दागिने, गुन्ह्यात वापरलेले साहित्य आणि इतर मिळून १० लाख ६३ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**चोरीचा माल खरेदी करणारे सराफही जाळ्यात :**

तपासादरम्यान आरोपी सुरजितसिंग याने चोरीतील दागिने लक्ष्मण गणेश रणशिंग (वय २७) व संतोष विलास साबळे (वय २९, दोघेही रा. हडपसर, पुणे) यांना विकल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेतले. तसेच उर्वरित सोने खरेदी करणारा अब्दुल वहिद अब्दुलकादर शेख (वय ४५, रा. रविवार पेठ, पुणे, मूळ रा. पश्चिम बंगाल) यालाही अटक करण्यात आली. दागिने चोरीचे असल्याची माहिती असूनही ते खरेदी केल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही उल्लेखनीय कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेश खेडकर यांच्या नेतृत्वाखाली जावेद जमादार, विनोद रजपूत, इम्रान जमादार, धीरज सातपुते, उमेश पवार, सुभाष मुंडे, वसीम शेख, काशिनाथ वाघे, आबा सावळे, सैपन सय्यद, विठ्ठल यलमार, राजू मोरे, सिद्धाराम देशमुख, अजय गुंड, अंकुश भोसले, बापू साठे, महेश शिंदे, अनिल जाधव, महेश रोकडे, शैलेश बुगड, महेश पाटील, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, चालक सतीश काटे, बाळासाहेब काळे आणि मारुती घोरपडे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.


## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे




**उभे शब्द :** १) राष्ट्रवादीचे नाशिक जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते २) महाराष्ट्रातील एक जिल्हा, या जिल्ह्यातून गोदावरी नदी वाहते ३) माकड ४) स्वभावाने रागीट ५) क्रिकेटमधील फलंदाजाच्या हातातील लाकडी फळी (इंग्रजीत) ६) मिरच्या व गरम मसाला वापरून बनविलेले तिखट ९) जुनाच्या विरूध्दार्थी शब्द १२) गुटर घुं करणारा पक्षी १३) आर्थिक व्यवहारात केलेला घोटाळा १५) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) १७) उत्तरप्रदेश संक्षिप्तमध्ये असे लिहितात-** १९) घर (हिंदीत) २०) तिखट न टाकता डाळीचे बनविलेले कालवण २१) मनसे अध्यक्ष-** ठाकरे २३) फसवणूक करणारा २५) झुणका बनविण्यासाठी केलेले डाळीचे पीठ-*** पीठ २७) आवकच्या विरूध्दार्थी २८) रोख ३०) स्वत:वरील विश्वास, सचिन पिळगावकरचा एक चित्रपट ३२) दैत्य, राक्षस ३४) पुष्कळ, भरपूर ३५) धातूचा बारीक तंतू ३६) अध्ययन, रिडिंग (मराठीत) ३७) लिंबूपाण्याचे पेय ३३) सूर्य ३९) गंध, परीमळ ४१) मुंबईतील प्रमुख रेल्वे स्टेशन ४३) एक दुग्ध पेय ४५) सहा गुणिले दोन

**आडवे शब्द :** १) यात्रेनिमित्त देवाची वाजतगाजत काढलेली मिरवणूक ३) पश्चिम बंगालच्या महिला मुख्यमंत्री ७) खा. अमोल कोल्हे यांचा लोकसभा मतदारसंघ ८) वर्गातील मुलांची एकूण संख्या ९) बोल्टचा जोडीदार, अभिनेता १०) जवळ, समीप ११) कपडे वा मौल्यवान वस्तू ठेवण्याची मोठी पेटी १३) पायात चप्पल न घालता चालणे १४) हॉटेलमधील नोकर १५) खडबडीत (इंग्रजीत) १६) सीताहरण प्रसंगी रावणाशी लढा देणारा मोठा पक्षी १८) एक सद्गुरू-***** पै २२) धान्याचे केलेले बारीक चूर्ण २४) पटाईत, पारंगत २६) शिवसेनेचे मुंबईतील एक नेते-**** किर्तीकर २९) कोकणात आढळणारे वरून काटेरी पण आत गोड गरे असणारे मोठे फळ ३०) चार दुणे ३१) तमाशातील नाट्यप्रकार ३२) दरवाजा ३३) फायदा, लाभ ३५) शक्तीमान, ताकद असलेला ३८) शासकीय कार्यालयीन सुट्टीचा वार ४०) स्वादिष्ट, रूचकर ४२) एकमेकाबद्दल असलेली खात्री, हमी ४३) एक म्हण-*** तोंडी मोठा घास ४४) शब्दाला असलेले वजन, दरारा ४६) दोरी ४७) श्रीरामाचा एक बंधू, कैकयी पुत्र

## सुडोकु - 289

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | | | | 5 | 6 | 2 | |
| | 7 | 5 | 9 | | | | 1 | |
| | 3 | | 7 | 2 | | 5 | 9 | |
| | 5 | 4 | | | | 3 | 6 | |
| | | 3 | | 9 | | | | 5 |
| | 6 | | | | 7 | 2 | | |
| 4 | 9 | | 5 | 8 | | 7 | | 6 |
| | 8 | 7 | 2 | | | | 5 | 1 |
| | | 6 | 4 | | | 9 | 8 | |

# पीकविम्यासाठी कल्याणशेट्टींची आक्रमक मागणी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा पीकविमा वेळेत व पूर्ण स्वरूपात मिळावा, तसेच पीकविमा योजनेतील रद्द करण्यात आलेले चार महत्त्वाचे निकष तातडीने पूर्ववत करावेत, अशी जोरदार मागणी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी विधानसभेत केली.

प्रधानमंत्री पीकविमा योजनेअंतर्गत 'पेरणी न होणे', 'हंगामातील प्रतिकूल परिस्थिती', 'स्थानिक नैसर्गिक आपत्ती' आणि 'काढणीनंतरचे नुकसान' हे चार महत्त्वाचे ट्रिगर्स शासनाने रद्द केल्यामुळे यंदा पीकविमा भरपाईत मोठी घट झाली असून अनेक शेतकरी लाभापासून वंचित राहिल्याचा मुद्दा त्यांनी सभागृहात उपस्थित केला.

गत चार वर्षांत महायुती सरकारने शेतकऱ्यांना भरीव मदत दिली होती. मात्र यंदा ही मदत केवळ २५ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण असल्याकडेही त्यांनी शासनाचे लक्ष वेधले.



नैसर्गिक आपत्ती, उत्पादनातील घट आणि वाढता आर्थिक ताण यामुळे बळीराजा आधीच संकटात सापडला असून अशा परिस्थितीत त्याला वाऱ्यावर सोडणे योग्य ठरणार नाही, असे सांगत शासनाने शेतकऱ्यांच्या नुकसानीची गांभीर्याने दखल घेऊन त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

शेतकऱ्यांचे झालेले आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी पीकविमा योजनेतील रद्द करण्यात आलेले चारही निकष तातडीने पूर्ववत करण्यात यावेत, अशी मागणी आमदार कल्याणशेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडे केली.

# उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांना 'वृक्षस्नेही' पुरस्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वृक्षदाई प्रतिष्ठान, श्रीक्षेत्र देहू यांच्या वतीने आयोजित 'निर्मल वारी-हरित वारी' अभियानात सोलापूरच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर यांना पर्यावरण संवर्धनासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'वृक्षस्नेही' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. शिवाजीराव महाराज मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली देहू परिसरात मोठ्या प्रमाणावर वडाच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमांतर्गत हजारो वडाच्या रोपांची लागवड करून हरित महाराष्ट्राच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले.



या कार्यक्रमात पर्यावरण संरक्षणासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिला लोकप्रतिनिधींचा 'वृक्षस्नेही' म्हणून गौरव करण्यात आला. त्यामध्ये उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांचा समावेश होता. त्यांना सन्मानपत्र आणि संत तुकाराम महाराजांची अभंग गाथा भेट देऊन गौरविण्यात आले.

यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वडाच्या रोपांचे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करण्यात आला. कार्यक्रमास नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजूषा नागपुरे, पिंपरी-चिंचवडच्या उपमहापौर, देहूच्या नगराध्यक्षा पूजा दिवटे, पोलीस उपायुक्त श्वेता खेडकर, सारिका शेळके तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात; १.८६ कोटींचा निव्वळ नफा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नीलकंठ को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूरने मार्च २०२६ अखेर १ कोटी ८६ लाख ३७ हजार रुपयांचा निव्वळ नफा मिळवित भक्कम आर्थिक कामगिरीची नोंद केली आहे. यंदा सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती बँकेचे चेअरमन सीए धनराज नोगजा यांनी दिली.

**बँकेची आर्थिक कामगिरी एका नजरेत :**

- निव्वळ नफा : १.८६ कोटी रुपये
- ठेवी : २११.५९ कोटी रुपये
- खेळते भांडवल : २४७.१३ कोटी रुपये
- भागभांडवल : ५.३६ कोटी रुपये
- कर्जवाटप : १२६.८४ कोटी रुपये
- निधी : १५.४९ कोटी रुपये
- गुंतवणूक : ८७.१३ कोटी रुपये
- एनपीए : ०.०० टक्के
- ऑडिट वर्ग : 'अ'

बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवारी माहेश्वरी सांस्कृतिक भवन येथे उत्साहात पार पडली. यावेळी व्हाईस चेअरमन पद्मा भुतडा, संचालक रमेश राठी, चंद्रकांत तापडिया, प्रदीपकुमार शिंगवी, जमनादास भुतडा, कौस्तुभ करवा, शरद कालाणी, सचिन कोठारी, अभिजित चिल्लाळ, किरण शेरखाने, नंदकुमार भोसले, सीएस नंदा भट्टड, तज्ज्ञ संचालक सीए आनंद झंवर, ॲड. महेश अग्रवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी बँकेचे संस्थापक दिवंगत विश्वनाथ करवा यांना अभिवादन करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. व्हाईस चेअरमन पद्मा भुतडा यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद बलदवा यांनी इतिवृत्ताचे वाचन केले. त्यास सभासदांनी सवार्नुमते मंजुरी दिली. तज्ज्ञ संचालक सीए आनंद झंवर यांनी ताळेबंद सादर केला.

अध्यक्षस्थानावरून बोलताना चेअरमन सीए धनराज नोगजा यांनी बँकेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेतला. मागील वर्षभरातील विविध आर्थिक निर्देशकांमध्ये बँकेने उल्लेखनीय वाढ नोंदविल्याचे सांगत सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याचा निर्णय जाहीर केला. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

यावेळी विजयकुमार शाबादीया यांनी मार्गदर्शन केले. तसेच बँकेच्या गुणवंत सभासदांच्या पाल्यांचा व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन अन्नपूर्णा सामलेटी यांनी केले, तर आभार संचालक चंद्रकांत तापडिया यांनी मानले. सभेला बँकेचे सभासद, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी शेतकऱ्यांचा एल्गार

**करकंब (कटूसत्य वृत्त):-** प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाला विरोध अधिक तीव्र होत असून, सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी करकंब येथे झालेल्या एल्गार मेळाव्यात महामार्गासाठी एक इंचही जमीन देणार नसल्याचा ठाम निर्धार व्यक्त केला. महामार्ग विरोधी समितीच्या वतीने आयोजित या मेळाव्यात शेतकरी, महिला व विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



यावेळी उपस्थितांनी शक्तिपीठ महामार्गामुळे जिल्ह्यातील ऊस, द्राक्षे, डाळिंब, केळी, भाजीपाला आदी बागायती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असल्याची चिंता व्यक्त केली. द्राक्ष, डाळिंब व केळी उत्पादक शेतकऱ्यांनी लाखो रुपये खर्च करून उभारलेल्या बागा या महामार्गामुळे संपादित होणार असल्याने हा प्रकल्प शेतकऱ्यांच्या हिताविरोधात असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

मेळाव्यास विधानपरिषद गटनेते सतेज पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, कॉम्रेड गिरीश फोंडे, के. के. पाटील, विजय रणदिवे, शिवाजी पाटील, गोकुळ दूध संघाचे संचालक प्रकाश पाटील यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, शेतकरी आणि माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी "गरज नसलेला शक्तिपीठ महामार्ग आम्हाला नकोच","एक इंचही जमीन देणार नाही" अशा घोषणा देत शेतकऱ्यांनी शासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

वक्त्यांनी सांगितले की, सोलापूर जिल्ह्यातून यापूर्वीच पुणे–हैदराबाद, रत्नागिरी–नागपूर, दोन पालखी महामार्ग तसेच नाशिक–अक्कलकोट महामार्गासाठी मोठ्या प्रमाणावर जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. सोलापूर हे राज्याच्या वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने केंद्रस्थानी असून राज्याच्या कानाकोपऱ्यात जाण्यासाठी दर्जेदार रस्त्यांचे जाळे आधीच उपलब्ध आहे. त्यामुळे नव्याने शक्तिपीठ महामार्ग उभारण्याची आवश्यकता नसल्याचा दावा यावेळी करण्यात आला. महामार्गाचा प्रस्ताव तातडीने रद्द करावा, अन्यथा शेतकरी आणखी तीव्र आंदोलन छेडतील, असा इशाराही मेळाव्यात देण्यात आला.

# शहरातील विविध प्रश्न बाबत खा. ज्योतीताई वाघमारे यांना निवेदन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- शिवसेनेच्या खासदार डॉ.प्रा. ज्योतीताई वाघमारे यांना सोलापुरातील शहराच्या विविध प्रश्नांवर संभाजी ब्रिगेडच्या वतीने सात रस्ता येथील शासकीय विश्रामगृह मध्ये भेट घेऊन शहरातील विविध प्रश्नावर चर्चा करून निवेदन देण्यात आले.



खासदार ज्योतीताई वाघमारे यांची संभाजी ब्रिगेडच्या शिष्टमंडळाने शासकीय विश्रामगृहामध्ये भेट घेऊन त्यांचा शाल व छत्रपती संभाजी महाराजांची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विजापूर रोड वरील छत्रपती संभाजी महाराज तलाव येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रमी इतिहासाच्या जीवनपटावर आधारित विविध प्रसंगाचे भित्ती शिल्पे उभारण्यात येणार असून त्यासाठी निधी सुद्धा मंजूर झाला आहे आणि लवकरच त्या कामाचे उद्घाटन करण्यात येणार आहे अशी माहिती संभाजी ब्रिगेडच्या शिष्टमंडळाला देऊन कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आमंत्रणही दिले त्याचबरोबर शहरातील चार हुतात्मा पुतळ्या लगत नियोजित जिजाऊ स्मारकासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्यासाठी मी कटिबद्ध असून लवकरच याबाबत जातीने लक्ष घालणार असल्याचे सांगितले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे मा. पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मीनलताई दास मा. शहराध्यक्ष शिरीष जगदाळे एडवोकेट बाबासाहेब सपाटे जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले उद्योग आघाडीचे शहराध्यक्ष संतोष सुरवसे उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष विक्रम वानकर दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष जैनुद्दीन नदाफ जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश डोंगरे शहर सचिव सतीश वावरे आदि उपस्थित होते.

# छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त अभिवादन सोहळा



**माढा (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी अठरा पगड जातीमधील मुलांना शिक्षणा शिवाय समाजाचा विकास अशक्य आहे.हे ध्यानी घेऊन त्यांनी शिक्षणाची दारे खुली करुन शैक्षणिक क्रांती केली. असे मत माजी आ.धनाजीराव साठे यांनी व्यक्त केले.

छत्रपती शाहु महाराजांच्या जयंतीनिमित्त माढ्यातील फक्त सह्याद्री बहुउद्धेशीय संस्थेच्या वतीने शाहु महाराज अभिवादन सोहळा पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन माजी आ.साठे बोलत होते.प्रारंभी शाहु महारांजाना मान्यवरांच्या उपस्थितीत पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात आले. विचार मंचावर विधीज्ञ डॉ.श्रीरंग लाळे, दिपक जगताप, बप्पा कन्हेरे, दत्ताजी शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी संस्थेच्या वतीने यंदाचा २०२६ चा "सह्याद्री उद्योग रत्न" पुरस्कार उद्योग क्षेत्रात शुन्यातुन विश्व निर्माण केलेल्या चिंचोली मधील दिनेश लोंढे यांना प्रदान करण्यात आला. संस्थे मार्फत राबवण्यात येणार्या सामाजिक उपक्रमाची माहिती अध्यक्ष दत्ताजी शिंदेनी प्रास्ताविकातून दिली.माजी. आ.साठे पुढे म्हणाले, १९१७ मध्ये कोल्हापुरात मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा कायदा लागू केला. गोरगरीब आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शहरात राहता यावे, म्हणून त्यांनी मराठा, जैन, लिंगायत, मुस्लिम, महार, चांभार अशा विविध जातींच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे सुरू करुन ज्ञानाची विद्यापिठ उभा केली.ॲड.श्रीरंग लाळे म्हणाले, शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारणासाठी आणि जातिभेद नष्ट करण्यासाठी मोठे प्रयत्न केले. प्रशासनात मागासलेल्या घटकांना प्रतिनिधित्व मिळाले. आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांना कायदेशीर मान्यता देणारा कायदाही त्यांनी केला. यावेळी संस्थे मार्फत राबवण्यात येणार्या ग्राहक सन्मान योजनेचे बक्षिस वितरण पार पडले. यावेळी शारदा शिंदे, धनश्री शिंदे, श्रीकांत काशीद, रानबा कदम, जयदीप शिंदे, राहुल पडदुणे, सुहास लट्ठे, औदुबर पवार, प्रमोद जगताप, यश जाधव, भिसे, सार्थक शिंदे आदी उपस्थित होते. बंडु पवार यांनी जिजाऊ वंदना गायन केली. श्रीकांत काशिद यांनी सुत्रसंचलन तर संदीप शिंदेनी आभार मानले

# ९८ केंद्रप्रमुखांची नियुक्ती; सोलापूरच्या शिक्षण व्यवस्थेला नवे नेतृत्व- चेतनसिंह केदार-सावंत

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषद कार्यालयात स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पात्र शिक्षकांना केंद्रप्रमुख पदोन्नतीची नियुक्तीपत्रे प्रदान करण्याचा सोहळा उत्साहात पार पडला. महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते ९८ शिक्षकांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले.



या पदोन्नती प्रक्रियेत मराठी माध्यमातील ९२, उर्दू माध्यमातील ३ आणि दिव्यांग संवर्गातील ३ अशा एकूण ९८ शिक्षकांचा समावेश आहे. या नियुक्त्यांमुळे जिल्ह्यातील शैक्षणिक प्रशासन अधिक सक्षम होण्यास मदत होणार असून, प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी तसेच शाळांच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी केंद्रप्रमुखांची भूमिका अधिक बळकट होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सक्षम नेतृत्वाची गरज अधोरेखित केली. पदोन्नती मिळालेल्या केंद्रप्रमुखांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, शिक्षकांच्या मार्गदर्शनासाठी आणि शैक्षणिक उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रामाणिकपणे कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. शासन शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी कटिबद्ध असून विद्यार्थीकेंद्रित आणि गुणवत्ताधिष्ठित शिक्षण व्यवस्थेसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजित पवार, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती मा. रामप्पाजी चिवडशेट्टी, समाजकल्याण समिती सभापती सौ. संस्कृतीताई सातपुते, महिला व बालकल्याण समिती सभापती सौ. अमृताताई वाघे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, जिल्हा परिषद सदस्य आदिनाथ देशमुख व बालाजी नरोटे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) चंद्रशेखर जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) सौ. स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) सूर्यकांत भुजबळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सौ. मीनाक्षी वाकडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कादर शेख, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, जिल्हा आरोग्य अधिकारी सतीश कोपरवाड, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे तसेच जिल्हा परिषदेचे विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी पदोन्नती मिळालेल्या सर्व केंद्रप्रमुखांचे अभिनंदन करण्यात आले. या निर्णयामुळे जिल्ह्यातील शैक्षणिक प्रशासन अधिक कार्यक्षम होऊन विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या उद्दिष्टाला नवी गती मिळेल, असा विश्वास जिल्हाध्यक्ष तथा सोलपुर जिल्हा शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी व्यक्त केला.

# बाबुराव पाटील महाविद्यालयामध्ये एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

**अनगर (कटूसत्य वृत्त):-** बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आयोजित रार्ष्टीय शैक्षणिक धोरण (२०२०) या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उदघाटन श्री अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. चंद्रकांत ढोले यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत सुर्यवंशी हे होते. या कार्यशाळेसाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रो. डॉ. एस.आर. पुजारी व प्राचार्य डॉ. एस.बी. करंडे हे होते.या प्रसंगी चंद्रकांत ढोले यांनी रार्ष्टीय शैक्षणिक धोरणातील सर्व चांगल्या गोष्टी महाविद्यालयात योग्य पद्धतीने राबविल्या गेल्या पाहिजेत असे मार्गदर्शन केले.



या प्रसंगी प्राचार्य डॉ. चंद्रकांत सुर्यवंशी यांनी रार्ष्टीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थी केंद्रीत आहे. त्यासाठी महाविद्यालयात विविध उपक्रम राबविले पाहिजेत. असे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रो.डॉ.एस. आर.पुजारी यांनी स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र मिळाल्यानंतरची शैक्षणिक धोरणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०)ची गरज, आकृतीबंध, पाच स्तंभ, मेजर व मायनर विषय, धोरण राबवितानाची जबाबदारी, आव्हाने याविषयी सखोल मार्गदर्शन केले. या प्रसंगी डॉ. संजय करंडे यांनी नवीन रार्ष्टीय शैक्षणिक धोरण (१९८६) व रार्ष्टीय शैक्षणिक धोरण(२०२०) याचा तौलनिक दृष्ट्या मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक समन्वयक प्रा.डॉ.विशाल कदम यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. महादेव चव्हाण यांनी केले व आभार प्रा. शिवदिप देशमुख यांनी मानले. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

# न्यासाचे भक्ताभिमुख कार्य - पोलीस निरीक्षक पवार



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचे भक्ताभिमुख कार्य असल्याचे मनोगत उत्तर पोलीस ठाण्याचे नूतन पोलीस निरीक्षक अविनाश एकनाथ पवार यांनी व्यक्त केले.

ते उत्तर पोलीस ठाण्याचा पदभार घेतल्यानंतर श्रींचे दर्शन घेऊन, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी त्यांच्या समवेत श्रीकांत जवळगे, फिरोज इनामदार, धर्मराज चौधरी, केदारनाथ सुतार, धोंडीबा डेंगळे, गणेश अंगुले हे पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी पुरोहित सोमकांत कुलकर्णी, प्रवीण घाटगे, निखील पाटील, अतिश पवार, बाळासाहेब पोळ, दत्ता मोरे, दत्ता माने, शुभम सावंत, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, राहुल इंडे, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# एक ही दिव्यांग व्यक्ती शासकीय योजना पासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्या -अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील दिव्यांगासाठी असलेल्या विविध शासकीय योजना त्यांच्यापर्यंत पोहोचल्या पाहिजेत या दृष्टीने सर्व शासकीय विभागांनी प्रयत्न करावेत. तसेच शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील एकही दिव्यांग व्यक्ती शासकीय योजना व लाभांपासून वंचित राहणार नाही, याची संबंधित सर्व विभागांनी दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील अप्पर जिल्हाधिकारी यांच्या दालनात आयोजित जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण बैठकीत श्री. निऱ्हाळी मार्गदर्शन करत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, सह आयुक्त नगरपालिका प्रशासन अशिष लोकरे, जिल्हा दिव्यांग अधिकारी सुलभा वटारे, संजय गांधी योजनेचे तहसिलदार शिल्पा पाटील, कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे, महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाच्या प्रिती पासकंटी, प्राथमिक शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी सुहास गुरव, अशासकीय सदस्य दत्तात्रय मोकाशी यांच्यासह संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

श्री. निऱ्हाळी पुढे म्हणाले की, दिव्यांगांना वैयक्तिक लाभ दिला जात असेल तर तो चांगलाच असून, जिल्ह्यातील दिव्यांगांची एकूण संख्या विचारात घेऊन खर्चाच्या अनुज्ञेय बाबीनुसार अधिकाधिक चांगल्या कामाची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शिष्यवृत्तीमध्ये ऑनलाईन/ऑफलाईन प्रक्रियेमुळे निर्माण होणारी संदिग्धता दूर करून, पात्र विद्यार्थ्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन करून उदिष्टपूर्ती साध्य करावी, असेही त्यांनी सुचित केले.

सर्व शासकीय इमारती, कार्यालय यामध्ये दिव्यांगांना सहज प्रवेश करता यावा यासाठी रॅम्प, व्हीलचेअर, कमोड शौचालय, दिशादर्शक फलक इत्यादी अत्यावश्यक बाबींची योग्य अंमलबजावणी करण्याबाबतही अपर जिल्हाधिकारी निऱ्हाळी यांनी सूचना दिल्या.

यावेळी बैठकीत दिव्यांग विवाह प्रोत्साहन अनुदान, शारीरिकदृष्ट्या दिव्यांग व्यक्तींना लघु उद्योगासाठी अर्थसहाय्य बीज भांडवल योजना, पूर्व माध्यमिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, जिल्हा परिषद 5 टक्के सेस फंडातून शेळी गट, झेरॉक्स मशीन, मिरची कांडप व ई-बाईक अशा विविध योजनांचा आढावा घेण्यात आला.